ePaper

## श्रीरामाची पूजा करतात आणि रावणाचं राज्य...: संजय राऊत!



| वर्ष - 7 । अंक - 252 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 21 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- शोएबच्या'निकाह'वर कुटुंबीय नाराज
- तुला शिकवीन चांगलाच धडा
- मंदिरासाठी वाट पाहणारे हिंदू सहिष्णू
- एकनाथ शिंदे अयोध्येला जाणार नाहीत


# प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत

# राज्यात 15 लाख घरांची निर्मिती!

## पिंपरी-चिंचवडमधील आवास प्रकल्पांसाठी लाभार्थींची ‘लॉटरी’

। पिंपरी ।महाईन्यूज ।।

**राज्यातील नागरिकांना हक्काचं आणि चांगलं घर मिळावं तसंच झोपडपट्टी विरहीत शहर असावं आणि राज्यातील प्रत्येक गरीब बांधवाला हक्काचं घर मिळावं हे शासनाचं स्वप्न आहे. त्यासाठी १ हजार ५३८ प्रकल्पांच्या माध्यमातून १५ लाख सदनिकांच्या उभारणीसाठी मान्यता देण्यात आली आहे, असं प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतर्फे पिंपरी आणि आकुर्डी येथे प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत (शहरी) उभारलेल्या गृहप्रकल्पातील लाभार्थी निश्चित करण्यासाठी चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित संगणकीय सोडत कार्यक्रम उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये झाला. अजित पवार म्हणाले की, राज्यात ९ लाख सदनिकांना केंद्रीय मान्यता संनियंत्रण समितीची मान्यता मिळाली आहे. ६ लाखांहून अधिक कुटुंबांना सदनिकांसाठी अनुदान देण्यात आलं आहे. राज्यात मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, पिंपरी चिंचवड या महानगरपालिका क्षेत्रात म्हाडा, सिडको, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प आदी माध्यमातून घरं उपलब्ध होत आहेत.

### इमारतींच्या पुर्नविकासाचा मार्ग मोकळा : अजित पवार

» आदिवासी बांधवांसाठी शबरी आवास योजना, आदिम आवास योजना, अनुसूचित जातीच्या नागरिकांसाठी रमाई घरकूल योजना, पारधी आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना राबवण्यात येत आहेत. अशा विविध योजनांमधून नागरिकांना हक्काचं घर मिळवून देण्यात येईल. ग्रामीण भागातील पंडित दीनदयाळ उपाध्याय योजनेंतर्गत जागा खरेदीसाठी अनुदान १ लाखापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गरजू कुटुंबांना घर मिळाल्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद मनाला समाधान देणारा आहे. म्हाडा अधिनियम सुधारणा विधेयकाला राष्ट्रपतींची मंजूरी मिळाली असल्यानं धोकादायक इमारतींच्या पुर्नविकासासाठी तसंच रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लाभ होणार आहे.

---

# शहरातील प्रमुख १७ रस्त्यांवर स्वच्छता अभियान

## महापालिका प्रशासनाचा उपक्रम : राज्य सरकारच्या निर्देशाची अंमलबजावणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने शहरातील प्रमुख १७ रस्त्यांवर सखोल स्वच्छता अभियान राबविण्यास सुरूवात झाली आहे. या अभियाना अंतर्गत शुक्रवारी दि.१९ रोजी सकाळी निगडी ते दापोडी या मार्गाच्या दोन्ही बाजूला सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात आले.**



या अभियानात तब्बल ५० टन माती, कचरा गोळा करण्यात आला. तसेच पाण्याने रस्ते दुभाजक धुवून काढण्यात आली. या अभियानात सुमारे १२०० कर्मचा-यांनी सहभाग घेतला अशी माहिती आरोग्य विभागाचे सहायक आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली. पिंपरी चिंचवड शहरात आठ क्षेत्रीय कार्यालये असून ३२ प्रभाग आहेत. या सर्व प्रभागात सखोल स्वच्छता मोहिम राबविण्याचे राज्य सरकारने निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या निर्देशानुसार शहराच्या विविध भागातील रस्ते, चौकात स्वच्छता अभियान राबविण्यास सुरुवात केली आहे.

### 50 टन कचरा, माती संकलन...

» याबाबत माहिती देताना सहायक आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, शहरातील विविध रस्त्यांवर सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. शुक्रवारी सकाळी ७ ते १० या वेळेत निगडी ते दापोडी या मार्गावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये तब्बल ५० टन कचरा, माती गोळा करून कचरा डेपोमध्ये डंपिंग केला आहे. या अभियानावेळी वाहतूक सुरळीत रहावी, यासाठी वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी सहकार्य केले.

# पैसे वाचले म्हणून ते उधळू नका!

## चौफुला, टेंभुर्णीला जाऊन तिथं उधळपट्टी करू नका : पवार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मी लवकर आल्यानं काहींची अडचण झाली. सकाळी-सकाळी लवकर सुरुवात केली ते कामांसाठी बरं पडतं. पण त्यामुळं काहींची अडचण झाल्याचं दिसतंय,असा टोला उपमुख्यमंत्री अजित पवारांनी (AJIT PAWAR) मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंना (CM EKNATH SHINDE) लगावला आहे. तसंच एक किंवा दोन आपत्यावर थांबा.**





खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढली असून काही दिवसांनी ब्रह्मदेव आला तरी घरं बांधून देऊ शकणार नाही, असेही अजित पवार म्हणाले. पिंपरीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. बाबांनो माझी तुम्हाला विनंती आहे, एक किंवा दोन आपत्यावर थांबा. मी इथला खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढलेली आहार. लोकसंख्या अशीच वाढत गेली ना मग अगदी ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरं बांधुन देऊ शकणार नाही. पंतप्रधान आवास योजनेत काहींचं नशीब उजळेल. मात्र काहींना घरं मिळणार नाहीत. त्यामुळं नाउमेद होऊ नका. तर ज्यांच्या घराचं स्वप्न पूर्ण होईल, म्हणून अगदीच भारावून जाऊ नका. पैसे वाचले म्हणून ते उधळू नका. नाहीतर चौफुला, टेंभुर्णीला जाऊन तिथं उधळपट्टी करू नका, असा सल्ला अजित पवारांनी दिला आहे. पंतप्रधान आवास योजनेची सोडत ही पारदर्शक आहे. तुम्ही अगदी माझ्याकडे आले अन् म्हणाले दादा माझी चिठ्ठी काढा तर ते मला ही जमणार नाही. मलाच काय तर कोणाच्याच हातात हे नाही. नाहीतर काही शहाणे असतात,जे म्हणतात मी घर मिळवून देतो. असले कोणतेही एजंट प्रशासनाने नेमलेले नसतात. अगदी कोणाचे पीए असतील त्यांच्यावर ही विश्वास ठेवू नका. नाहीतर दस का बीसचे प्रकार घडतात. आता नशिबाने तुमचा नंबर लागणार आणि हे शहाणे म्हणतात बघा माझ्यामुळंच तुमचं स्वप्न पूर्ण झाल, असे म्हणून ते पैशांची लुबाडणूक करतात. अशा शहाण्यांना मी सरळ करणार आहे.महापालिकेने प्रधानमंत्री आवास योजनेंर्गत पिंपरी आणि आकुर्डी येथे उभारलेल्या प्रकल्पातील ९३८ सदनिकांची सोडत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते शनिवारी चिंचवड येथे पार पडली. यावेळी भाषण करताना अजित पवारांनी जोरदार फटकेबाजी केली.अजित पवार म्हणाले की, मी १९९१ ला पिंपरी-चिंचवडमधून पहिल्यांदा खासदार झालो, तेव्हाची लोकसंख्या आणि आताची लोकसंख्या किती झाली आहे. झपाट्याने लोकसंख्या वाढत आहे. त्यामुळे एक किंवा दोन अपत्यावर थांबावे. नाही तर ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरे बांधून देऊ शकत नाही. त्यामुळे सरकारबरोबर नागरिकांचीही जबाबदारी आहे. सोडतीमध्ये घर मिळाले नाही म्हणून नाराज झाले तरी चालेल परंतु निराश मात्र होऊ नका, निराशा वाईट असते. निराश होऊन हिम्मत हारू नका असे आवाहनही अजित पवार यांनी लाभार्थ्यांना केले. तसेच निर्व्यसनी रहा, घर मिळाले नाही म्हणून पैसे उधळत बसू नका, चौफुला, टेंभुर्णीला जाऊ नका असे अजित पवार म्हणताच सभागृहात हशा उडाला. पैसे साठवा, त्यात भर घाला. घराचे स्वप्न एक दिवस पूर्ण होईल, असेही अजित पवार म्हणाले.सोडत पारदर्शक आहे. एकाही माणसाचा हस्तक्षेप नाही. त्यामुळे गैरप्रकार होण्याची कोणतीही संधी नाही.

### अगदी ब्रह्मदेव आला तरी...

» खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढली असून काही दिवसांनी ब्रह्मदेव आला तरी घरं बांधून देऊ शकणार नाही, असेही अजित पवार म्हणाले. पिंपरीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान आवास योजनेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. बाबांनो माझी तुम्हाला विनंती आहे, एक किंवा दोन आपत्यावर थांबा. मी इथला खासदार असताना असलेली लोकसंख्या आणि आता असलेली लोकसंख्या ही तुलनेने खुपचं वाढलेली आहार. लोकसंख्या अशीच वाढत गेली ना मग अगदी ब्रह्मदेव आला तरी सर्वांना घरं बांधुन देऊ शकणार नाही. पंतप्रधान आवास योजनेत काहींचं नशीब उजळेल. मात्र काहींना घरं मिळणार नाहीत. त्यामुळं नाउमेद होऊ नका. तर ज्यांच्या घराचं स्वप्न पूर्ण होईल, म्हणून अगदीच भारावून जाऊ नका. पैसे वाचले म्हणून ते उधळू नका.

# महिलांना ६ महिने पगारी मातृत्व रजा द्यावी लागते

## पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या सदस्याचे मोठे विधान

।पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जुन्या पेन्शन योजनेमुळे विकास कामांसाठीच्या निधी उपलब्धतेवर मोठा परिणाम होत होता. सन २००३ मध्ये जुन्या पेन्शन योजनेबाबत धोरण आणल्याने खर्चावर नियंत्रण आले. राजकीय पक्ष जुन्या पेन्शन योजनेची घोषणा करून मते मिळवतात. मात्र, जुनी पेन्शन योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही, असे मत पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या सदस्य डॉ. शमिका रवी यांनी मांडले.**



गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था येथे आयोजित ‘पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिव्हल’च्या उद्घानाच्या सत्रात डॉ. शमिका रवी बोलत होत्या. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे, महोत्सवाचे संयोजक इंद्रनील चितळे या वेळी उपस्थित होते.डॉ. शमिका रवी म्हणाल्या, की कोणत्याही योजनेचे आर्थिक मूल्य लक्षात घेतले पाहिजे. मनरेगा ही महत्त्वाची योजना आहे. करोना काळात त्या योजनेचे महत्त्व अधोरेखित झाले. अचूक धोरणनिर्मिती आव्हानात्मक आहे. अचूक धोरणासाठी विदा अचूक असावा लागतो. विदातथ्ये आणि धोरणनिर्मिती यांचा जवळचा संबंध आहे. संशोधन ही धोरण निर्मितीसाठीची मूलभूत बाब आहे. त्यामुळे धोरणनिर्मिती तथ्यांवर आधारित असणे आवश्यक आहे. देशात मातामृत्यूदर, बालमृत्यूदर कमी होत आहे. आर्थिक विकासामुळे बालमृत्यू घटले आहेत. प्रत्येक राज्याची आर्थिक धोरणे असली, तरी त्यांचा आर्थिक विकास समान पद्धतीने होत नाही. राज्यांमधील जिल्ह्यांची संख्या, त्यातील लोकसंख्या हे घटक महत्त्वाचे आहेत.

पदवीधर आणि त्यापेक्षा जास्त शिकलेल्यांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे, तर पदवीपेक्षा कमी शिक्षण असलेल्यांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण कमी आहे. उद्योग क्षेत्राला हवे असलेले कौशल्य आणि तरुणांकडे असलेले कौशल्य यात तफावत आहे. तरुणांनी मुक्त विदा वापरून त्याचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्या संशोधनाचा उपयोग धोरणनिर्मितीसाठी होऊ शकतो, असेही डॉ. शमिका रवी म्हणाल्या.

### महिलांचे कमी झालेले प्रमाण

» मातृत्व रजा योजनेमुळे कंपन्यांना महिलांना सहा महिने पगारी रजा द्यावी लागते. मात्र त्यासाठी कंपन्या तयार नसतात. त्यामुळे महिलांऐवजी पुरुष नोकरदार घेण्यास कंपन्या प्राधान्य देत आहेत. परिणामी नोकरदार महिलांचे कमी झालेले प्रमाण ही चिंतेची बाब आहे, असेही डॉ. शमिका यांनी सांगितले.जुन्या पेन्शन योजनेमुळे विकास कामांसाठीच्या निधी उपलब्धतेवर मोठा परिणाम होत होता. सन २००३ मध्ये जुन्या पेन्शन योजनेबाबत धोरण आणल्याने खर्चावर नियंत्रण आले. राजकीय पक्ष जुन्या पेन्शन योजनेची घोषणा करून मते मिळवतात. मात्र, जुनी पेन्शन योजना आर्थिकदृष्ट्या परवडणारी नाही, असे मत पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीच्या सदस्य डॉ. शमिका रवी यांनी मांडले.गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्था येथे आयोजित ‘पुणे पब्लिक पॉलिसी फेस्टिव्हल’च्या उद्घानाच्या सत्रात डॉ. शमिका रवी बोलत होत्या. गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेचे कुलगुरू डॉ. अजित रानडे, महोत्सवाचे संयोजक इंद्रनील चितळे या वेळी उपस्थित होते..

# महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी 'जल्लोष शिक्षणाचा' द्वारे व्यासपीठ!

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना सन्मानित करणार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका शाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व इतर कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्या कौशल्याला व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २३ आणि २४ जानेवारी रोजी बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी बनविलेल्या वस्तुंचे प्रदर्शन, माजी विद्यार्थ्यांचे अनुभव कथन, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा आणि विद्यार्थ्यांचा सन्मान तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश असणार आहे.**




'जल्लोष शिक्षणाचा २०२४' या भव्य कार्यक्रमाचा शैक्षणिक सराव विविध उपक्रमांद्वारे महापालिकेच्या सर्व १२८ शाळांमध्ये मागील दोन महिन्यांपासून सूरू आहे. शाळांमधील विद्यार्थ्यांची प्रतिभा, सर्जनशीलता तसेच शिक्षकांचे प्रयत्न आणि नवकल्पना प्रदर्शित करणे हे या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमात शिक्षणाच्या विविध पैलूंमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, नागरिक आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

याबाबत माहिती देताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' हा कार्यक्रम महापालिकेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढविण्याबरोबरच विद्यार्थ्यांसाठी सकारात्मक परिणाम घडवून आणेल अशी आशा आहे.

जल्लोष शिक्षणाचा या उपक्रमाद्वारे महापालिका शाळांमध्ये सकारात्मक आणि प्रेरणादायी वातावरण तयार होण्यास मदत होत असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळत आहे. अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील म्हणाले, 'जल्लोष शिक्षणाचा २०२४' हा उपक्रम महापालिका शाळांमधील महत्वाचा घटक आणि शिक्षणाचा उत्सव आहे.

या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थी, शिक्षकांना महापालिका शाळांच्या यशाचे आणि आकांक्षांचे साक्षीदार होण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

### कार्यक्रमाचे स्वरूप :

'जल्लोष शिक्षणाचा २०२४' या कार्यक्रमामध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय प्रदर्शन, विविध मुद्द्यांवर चर्चासत्र, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांचा सन्मान तसेच विविध शाळांमधील विद्यार्थ्यांच्या नृत्य, संगीत आणि लोककलांचा समावेश असणार आहे. तसेच शालेय प्रदर्शनांमध्ये शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेले प्रकल्प, आराखडे, चित्रकला, हस्तकलांचा समावेश असणार आहे.
चर्चासत्रांमध्ये महापालिका शाळांमधील माजी विद्यार्थी त्यांचा प्रेरणादायी प्रवास सांगणार आहेत. यासोबतच शिक्षणाच्या विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना यावेळी सन्मानित करण्यात येणार आहे.

---

# श्रीराम लल्ला प्राणप्रतिष्ठानिमित्त रथ यात्रा

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार : पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य कार्यक्रम

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राम जन्मभूमी अयोध्येतील श्रीराम मंदिर राष्ट्रार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त पिंपरी-चिंचवडमध्ये भव्य 'रथयात्रा' आयोजित केली आहे, अशी माहिती भाजपाचे प्रखर हिंदूत्ववादी आमदार महेश लांडगे यांनी दिली.**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. २२ जानेवारी २०२४ रोजी राम जन्मभूमी अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिराचे राष्ट्रार्पण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा होणार आहे. त्यासाठी देशभरामध्ये उत्सवाचे आणि आनंदाचे वातावरण आहे.

पिंपरी-चिंचवडमध्येसुद्धा राम मंदिर आणि श्रींच्या आगमनाचा उत्सव दिमाखदार होणार असून, रविवारी, दि. २१ जानेवारी २०२४ रोजी दुपारी ३ वाजता 'रथयात्रा' काढण्यात येणार आहे. शहरातील भक्ती-शक्ती चौक येथील यात्रेला सुरूवात होईल आणि रामायण मैदान चिखली येथे समोरोप होणार आहे. रथयात्रेमध्ये तब्बल हजारो दुचाकी व चारचाकी, चार विजयरथ, राम मंदिर प्रतिकृती, मर्दानी खेळ, डी.जे. ढोल पथक, झांज पथक, श्रीराम जिवंत देखावा, गंगा आरती, सनई चौघडे, महाबली हनुमान, कलश यात्रा, आतिषबाजी यासह हिंदू धर्माबाबत जागृती करण्यासाठी विविध देखावे असणार आहेत. विशेष म्हणजे, महिलांची बुलेट रॅलीसुद्धा होणार आहे.




> हिंदू धर्म...संस्कृती आणि अखंड भारताच्या अस्मितेचे प्रतीक प्रभू श्रीराम मंदिरासाठी ५०० वर्षांपासून भारतीयांना प्रतीक्षा करावी लागली आहे. पिढ्यांन् पिढ्यांनी पाहिलेले स्वप्न आता सत्यात उतरत आहे. या निमित्त आम्ही भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये विविध धार्मिक, सांस्कृतिक उपक्रम घेतले आहेत. राम मंदिर राष्ट्रार्पण दिनाच्या पूर्वसंधेला भव्य रथयात्रा होणार आहे. या दिमाखदार सोहळ्यात तमाम रामभक्त आणि पिंपरी-चिंचवडकरांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.




# कुठे चाललो आहोत आपण?

**जॉर्ज ऑर्वेलच्या 'ॲनिमल फॉर्म'मधील 'मानव' हा असा एकमेव प्राणी आहे की तो स्वतः काहीही निर्माण करीत नाही, पण सर्व 'स्वाहा' मात्र करतो, या विधानाची सत्यता पटू लागण्याच्या अवस्थेला आपण म्हणजे सगळा मानवी समाजच आलेला आहे, असे दिसते आहे. असे का झाले असेल? आपल्याला जगण्यापासून नेमके काय हवे आहे, मुळात आपण का जगतो याचा विचार आपण करतो का?**

तो तसा केला असता तर कसे जगायचे हे समजले असते का? आजचा माणूस खरेतर 'ह्युमॅनिटी'च्या प्रगत पातळीवर आज जगत आहे. असे असताना त्याला इतके असमाधान, इतका हव्यास का वाटतो आहे? शतकानुशतके कमालीचा पारमार्थिक असलेला समाज २०-२५ वर्षांत कमालीचा ऐहिक विचारांचा झाला, कोणताही विधिनिषेध न बाळगता फक्त ऐहिक सुखांच्या मागे लागला आणि ऐहिक सुखांच्या प्राप्तीसाठी अर्थार्जनाची एकमेव भाषा समजून घेऊ लागला. हा टोकाचा बदल त्याच्या मानसिकतेत झालेल्या बदलाचाच परिणाम, हे तर उघड दिसत आहे. अन्यथा ज्या मध्यमवर्गाने आपल्या नैतिक मूल्यांची जपवणूक नेहमीच शिरोधार्थ मानली तो मध्यमवर्ग 'मग त्यात काय?', 'सारेच भ्रष्टाचार करतात' असे भ्रष्टाचाराच्या



समर्थनार्थ म्हणू लागला. याचे स्पष्टीकरण कसे करता येईल? मोठा भ्रष्टाचार करून करूनच ही धनिक मंडळी साव म्हणून समाजात मिरवतात. त्यांचे कोणी वाकडे करते का, असा सूर मध्यमवर्ग काढू लागला. जुनी मूल्ये मोडीत निघाल्याचे हे लक्षण. विचार-आचारापासून विभक्त झालेला समाज भावनिक वा अन्य प्रकारच्या विघटनाकडे जातो, हे वास्तव आहे. आजघडीला समाजनेत्यांच्या आचारात, विचारात अंतर पडले आहे. त्याहून गंभीर बाब म्हणजे आम नागरिकांच्या आचार-विचारांतील तफावत वाढू लागली आहे. धार्मिक कृत्ये मनापासून करणारे व्यावहारिक क्षेत्रात लबाडी व अप्रामाणिकपणा करतात. या जन्मातच, मौजमजा करून घेतलेली बरी, हाच चार्वाकी विचार समाजधारणेत पक्का होत चालला आहे. पारंपरिक विचारांपासून मध्यमवर्ग दूर गेला, त्याने ऐहिक विचारांना कवटाळले, म्हणून समाजाचे भावनिक विघटन सुरू झाले आहे. मध्यमवर्ग तद्दन स्वार्थी बनला, म्हणून त्याचे पडसाद सर्वच क्षेत्रात उमटले आहेत. राजकारणापासून मध्यमवर्ग अलिप्त राहू लागला आहे, आपल्यापेक्षा उच्च वर्गाचे अनुकरण करू लागला आहे. उच्च वर्गाचा उर्मटपणा येणे व कनिष्ठ वर्गाबाबत अलिप्तता वाढणे यामुळे सामाजिक विघटनाची भावना वाढीस लागली आहे. समाजोन्नतीचे प्रयत्न सोडून केवळ व्यक्तिगत लाभासाठी आपला समाज प्रयत्नशील झाला. समाजातील भावनिक व इतर ताणतणाव कमी करण्याची जबाबदारी ही समाजधुरीणांची. पण ते त्यापासून परावृत्त झाले. टोकाची वैचारिक भूमिका घेत सामाजिक क्रांतीचे नारे द्यायचे; पण वागायचे मात्र सर्वसामान्यांसारखेच असे त्यांच्याबाबतीत होऊ लागले. विचार आणि आचार एकमेकांच्या उलट यामुळे त्यांना मान मिळेनासा झाला.राजकीय नेत्यांच्या नव्या पिढ्यांनी आपल्या सोयीस्कर राजकारणासाठी अप्रबुद्ध समाजाला वापरण्यास आरंभ केला. परिणामी गतकालातील समाजकाळ विस्मृतीत जाऊ लागले. विचार पुरोगामी होत गेले पण कृती पुरोगामी होईना. ज्याचे प्रबोधन झाले होते अशांच्या कुटुंबांनी जणू समाजाशी आपला संबंधच नाही असा आर्विभाव आणला. राजकीय, सामाजिक बदल प्रक्रियेत सामील होण्याचे टाळले. आपण आपले कुटुंब, स्नेही, स्वजातीय एवढ्यांभोवती अदृश्य असे संरक्षक कडे तयार केले. उर्वरित समाजातील घडामोडींबद्दल पूर्णपणे औदासीन्य बाळगले. जणू या समाजाशी आपले काही देणे-घेणेच नाही. आपल्या देशाची सर्वच आघाड्यांवर पडझड होत असताना अन्य प्रगत देशांकडे कूच करून तेथे आपले बस्तान बसविण्याचे धाडसही काही मंडळींनी केले. सुशिक्षित आणि प्रशिक्षित प्रबुद्धांनी आपल्या मेहनतीचे फळ आपल्या राष्ट्राला चाखायला न देणे हे आपल्या मातृभूमीचे एका अर्थाने नुकसान आहे, असे मातृभूमी सहजासहजी सोडून जाणाऱ्यांना वाटत नाही आणि ते ती सोडून चालल्याचे दुःख इतरांनाही वाटत नाही.

## संपादकीय »

# दहशतवाद!

***अरबी समुद्रात किंवा एडनच्या आखातामध्ये यापूर्वीच काही व्यापारी जहाजांवर हूथी बंडखोरांचे हल्ले सुरू आहेतच. म्हणजे झळ भारताच्या समीप पोहोचली आहे.***

शेजारी देशावर छुपे हल्ले करण्याची पाकिस्तानला सुरसुरी आणि खुमखुमी फार. खरे तर प्रत्येक देशाची स्वत:ची अशी सहनशीलता असते. ती ओलांडली गेल्यावर प्रतिहल्ले करण्याची हिंमत आणि क्षमता भारतासारखे देश दाखवू शकतात. तशी ती आपण वेळोवेळी दाखवलेलीही आहे. पण विश्व संघर्षमंचावर अलीकडे हे दोन ठरलेले कलाकार सोडून तिसऱ्याच कलाकाराने प्रवेश केला. त्या कलाकाराचे नाव इराण. गेले तीन दिवस या दोन देशांनी परस्परांच्या भूमीवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केले. 'आमच्या' देशाविरुद्ध 'त्या' भूमीतून कट रचला जातो, असे दोघांचे मत. त्यांतील सत्यासत्यता पडताळून पाहण्याची सध्या कुणाला फुरसत नाही आणि तशी गरजही नाही. आपले घर जळत असतानाही दुसऱ्याच्या घरातील चुलीत पाणी वा तेल ओतणे इतपतच वकूब असलेल्या या दोन देशांचे उपद्रवमूल्य उच्च कोटीचे आहे.

**गणेश काळे हा बीड जिल्ह्यातील एक बेरोजगार तरुण. गेल्या पाच वर्षांपासून त्याची शासकीय नोकरीसाठी पायपीट सुरू आहे. स्पर्धा परीक्षेच्या पूर्वतयारीसाठीचा खर्च मोठा असतो. तेवढी ऐपत नाही म्हणून गणेशने सारे लक्ष सरळ सेवा भरतीवर केंद्रित केलेले.**

# ज्याच्या कानात 'शेंगदाणा', त्यालाच मिळते नोकरी?

राज्यातील जिल्हा परिषद व तलाठीची भरती जाहीर झाल्यावर त्याने फुटपाथवर दुकान चालवणाऱ्या भावाकडून ३० हजार रुपये उसने घेतले व अनेक ठिकाणी अर्ज केले. पोलीस भरतीसाठी तो सहा जिल्हे फिरला. पण पोलीस भरतीसाठी शरीरयष्टी योग्य नसल्याने त्याची संधी हुकली. पोलीस नाही तर आता तलाठी तरी व्हायचेच म्हणत त्याने कसून अभ्यास केला. परीक्षेच्या काळात पेपरफुटीच्या बातम्यांनी तो अस्वस्थ होताच, तरीही त्याने मन लावून परीक्षा दिली. पण निकालानंतर त्यातही घोळ झाल्याचे दिसताच अस्वस्थ झालेल्या गणेशने शेतात जाऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. आजूबाजूचे लोक धावले आणि त्यांनी त्याला झाडावर गळफास घेण्यापासून परावृत्त केले. गणेशला वडील नाहीत. आई शेतमजुरी करते. भावाने उसनवारीसाठी तगादा लावलेला. पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या गणेशसमोर आता मोठा अंधार पसरला आहे.




लखन खटाणे हा सुद्धा बीडचाच. गेल्या पाच वर्षांपासून तो नोकरीच्या प्रतीक्षेत आहे. म्हाडाच्या परीक्षेत तो प्रतीक्षा यादीत क्रमांक एकवर होता. स्पर्धा परीक्षेत त्याची दोनदा चार गुणांनी संधी हुकली. तलाठी परीक्षेत त्याला दोनशेपैकी १८० गुण मिळाले पण दोनशेपेक्षा जास्त गुण मिळवणारे बघून तो हैराण झालाय. आता पुढे काय हा प्रश्न त्याच्यासमोर आ वासून उभा आहे.राज्याच्या कोणत्याही भागात गेले तरी असे कितीतरी गणेश आणि लखन भेटतात. लाखोच्या संख्येत असलेली ही तरुणाई सध्या अस्वस्थतेचे ओझे घेऊन जगतेय. त्यामागचे एकमेव कारण म्हणजे परीक्षेत होणारे गैरप्रकार. करोना काळानंतर झालेल्या आरोग्य खात्यातील भरतीपासून याचे ग्रहण लागले. त्यानंतर आठ परीक्षा राज्यात झाल्या. त्यातल्या पाचचे पेपर फुटले, सामूहिक कॉपीचे प्रकार घडले. यातली बहुतांश प्रकरणे उघडकीला आणली ती याच विद्यार्थ्यांनी. मग ते अहमदनगर असो, संभाजीनगर असो वा मुंबई. पिंपरी चिंचवड, बीड, नागपूर येथील गैरप्रकारही याच विद्यार्थ्यांनी उघडकीला आणले होते.परीक्षा जाहीर झाल्यावर तयारी करायची, कसून अभ्यास करायचा. ती दिली की जिथे कुठे गैरप्रकार घडल्याचे कानावर आले असेल तिथे समूहातील एकदोघांनी धाव घ्यायची. त्यांच्या तिकिट खर्चासाठी इतर सर्वांनी वर्गणी गोळा करायची. गैरप्रकार कसा घडला ते शोधल्यावर पोलीस ठाणे गाठायचे. तक्रार द्यायची. गुन्हा दाखल झाला की माध्यमांकडे धाव घ्यायची. बातम्या प्रकाशित झाल्या की सरकारवर दबाव आणण्यासाठी आंदोलने करायची. नेहमीप्रमाणे सरकारने लक्ष दिले नाही की निराश व्हायचे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# एकनाथ शिंदे अयोध्येला जाणार नाहीत!

## » बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न मोदीजी यांनी साकार केलं






। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी येथे उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात 22 जानेवारी 2024 रोजी श्रीरामलल्लांची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे. या भव्यदिव्य सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जाणार नाहीत. त्यांना सोहळ्याचे आमंत्रण आले आहे, पण त्यांनी न जाण्याचा निर्णय घेतला आहे.**

ट्वीट करत याबाबतची माहिती त्यांनी दिली आहे. तसेच अयोध्येला सर्व मंत्रिमंडळासह जाणार असल्याचेही त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये सांगितले आहे. अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार फक्त मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजितदादा पवार अशा तिघांनीच होण्याऐवजी संपूर्ण मंत्रीमंडळ, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि राज्यातील रामभक्त अशा सर्वांना घेऊन प्रभू श्रीराम यांचं दर्शन आम्ही घेणार आहोत, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.जय श्री राम..! अयोध्येत राम मंदीर उभारणीचे कोट्यवधी भारतीय आणि रामभक्त तसेच हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी साकार केलं आहे. मोदीजींचे शतशः आभार... अयोध्येमध्ये सोमवारी श्री प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. या ऐतिहासिक आणि नेत्रदीपक सोहळ्याचे आम्हाला निमंत्रण आहेच. देशवासीयांसाठी अभिमानास्पद अशा या अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार फक्त मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजितदादा पवार अशा तिघांनीच होण्याऐवजी संपूर्ण मंत्रीमंडळ, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि राज्यातील रामभक्त अशा सर्वांना घेऊन प्रभू श्रीराम यांचं दर्शन आम्ही घेणार आहोत. अयोध्येतल्या दर्शनाची तारीख आणि वेळ लवकरच ठरवत आहोत. रामजन्मभूमी ट्रस्टने निवडणूक आयोगाकडून यादी घेऊन देशातील नोंदणीकृत पक्षांच्या प्रमुखांना निमंत्रित केले आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना निमंत्रणे आली आहेत.एकनाथ शिंदे यांना शिवसेनेचे अध्यक्ष म्हणून निमंत्रण आले आहे, तर अजित पवार यांना राष्ट्रवादीचे अध्यक्ष म्हणून. त्याच न्यायाने राष्ट्रवादीच्या दुसऱ्या गटाचे प्रमुख म्हणून शरद पवार, वंचित बहुजनचे प्रकाश आंबेडकर इत्यादी नेत्यांना निमंत्रण देण्यात आली आहेत. क्रिकेट, सिनेमा, उद्योग इत्यादी क्षेत्रातील सेलिब्रिटीज यांना सुद्धा निमंत्रण दिली आहेत. देशातील कुठल्याही राज्याच्या मुख्यमंत्री/उपमुख्यमंत्र्यांना निमंत्रण नाही. केवळ राजशिष्टाचाराचा भाग म्हणून उत्तरप्रदेशात कार्यक्रम होत असल्याने तेथील राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांना निमंत्रण दिले आहे. भाजपाचे निमंत्रण हे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून जे.पी. नड्डा यांना. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री किंवा प्रदेशाध्यक्ष यांना निमंत्रण नाही. याशिवाय, 8000 निमंत्रितांमध्ये मोठा घटक हा देशभरातील संत-महंत. महाराष्ट्रातून अशा 409 संत-महतांना निमंत्रणट्रीट करत याबाबतची माहिती त्यांनी दिली आहे. तसेच अयोध्येला सर्व मंत्रिमंडळासह जाणार असल्याचेही त्यांनी आपल्या ट्वीटमध्ये सांगितले आहे. अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार फक्त मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजितदादा पवार अशा तिघांनीच होण्याऐवजी संपूर्ण मंत्रीमंडळ, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि राज्यातील रामभक्त अशा सर्वांना घेऊन प्रभू श्रीराम यांचं दर्शन आम्ही घेणार आहोत, असेही एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे.

### श्रीराम यांचं दर्शन आम्ही घेणार आहोत

» जय श्री राम..! अयोध्येत राम मंदीर उभारणीचे कोट्यवधी भारतीय आणि रामभक्त तसेच हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न देशाचे लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदीजी यांनी साकार केलं आहे. मोदीजींचे शतशः आभार... अयोध्येमध्ये सोमवारी श्री प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा होत आहे. या ऐतिहासिक आणि नेत्रदीपक सोहळ्याचे आम्हाला निमंत्रण आहेच. देशवासीयांसाठी अभिमानास्पद अशा या अभूतपूर्व क्षणाचे साक्षीदार फक्त मी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच अजितदादा पवार अशा तिघांनीच होण्याऐवजी संपूर्ण मंत्रीमंडळ, खासदार, आमदार, लोकप्रतिनिधी आणि राज्यातील रामभक्त अशा सर्वांना घेऊन प्रभू श्रीराम यांचं दर्शन आम्ही घेणार आहोत. अयोध्येतल्या दर्शनाची तारीख आणि वेळ लवकरच ठरवत आहोत. रामजन्मभूमी ट्रस्टने निवडणूक आयोगाकडून यादी घेऊन देशातील नोंदणीकृत पक्षांच्या प्रमुखांना निमंत्रित केले आहे. त्यामुळेच महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी येथे उभारण्यात आलेल्या भव्य मंदिरात 22 जानेवारी 2024 रोजी श्रीरामलल्लांची प्राणप्रतिष्ठापना होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

# राष्ट्रवादी आमदार अपात्रता सुनावणी ३० जानेवारीला

## »ठाकरे गटाच्या याचिकेवर 22 जानेवारीला सुनावणी



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी ३० जानेवारीला सर्वोच्च न्यायालयात होण्याची शक्यता आहे. विधानसभा अध्यक्षांनी आमदार अपात्रता प्रकरणाचा निर्णय लवकरात लवकर घ्यावा, यासाठी राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने याचिका दाखल केली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या वेळापत्रकात या याचिकेवरील सुनावणीची संभाव्य तारीख ३० जानेवारी आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने या आधीच राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणात सुनावणी पूर्ण करून निकाल देण्यासाठी विधानसभा अध्यक्षांना ३१ जानेवारी ही अंतिम मुदत दिली आहे. दरम्यान, विधानसभा अध्यक्षांना यासाठी वेळ वाढवून हवा असल्यास ते ३० जानेवारीला न्यायालयाला विनंती करू शकतात. शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात अध्यक्षांना निकाल देण्यासाठी १० दिवस वेळ वाढवून देण्यात आला होता.केंद्र सरकारने २२ जानेवारीला राम मंदिर प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमासंदर्भात अर्धा दिवस सुट्टीची अधिसूचना काढली आहे. त्यात सर्वोच्च न्यायालयाचाही उल्लेख आहे. तसेच सर्वोच्च न्यायालयासह देशातील सर्व न्यायालयांना सुट्टी देण्यात यावी, अशी विनंती बार कौन्सिलने केली सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांच्याकडेही केली आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयाने सुट्टीबाबत अद्याप कुठलीही माहिती किंवा सूचना जारी केली नाही. दरम्यान, राम मंदिर प्रकरणात निकाल दिलेल्या पाच सदस्यीय खंडपीठालाही राम मंदिर प्राण प्रतिष्ठा कार्यक्रमाचे निमंत्रण आहे. त्या खंडपीठामध्ये विद्यमान सरन्यायाधीश डॉ. डी. वाय. चंद्रचूड यांचा समावेश आहे. आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभाध्यक्षांच्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणाऱ्या शिवसेना ठाकरे गटाच्या याचिकेवर २२ जानेवारीला म्हणजेच राममंदिराच्या प्रतिष्ठापना दिनी सुनावणी होणार आहे. याच प्रकरणात शिंदे गटाने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेची अडचण होऊ नये यासाठी ठाकरे गटाच्या वकिलांनी १७ जानेवारीला धावपळ करून सर्वोच्च न्यायालयाकडे तातडीने सुनावणीची मागणी केली होती.

### या प्रकरणावर नोटीस जारी

» शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात विधानसभा अध्यक्षांनी १० जानेवारीला निकाल दिला.कोणत्याही बाजूच्या आमदारांना अपात्र ठरविले नसल्याने ठाकरे गट आणि शिंदे गटाने या निकालाला आव्हान दिले आहे. दरम्यान, ज्या न्यायालयात सर्वात आधी या प्रकरणावर नोटीस जारी होईल तिथे दोन्ही बाजूंना उपस्थित राहावे लागणार अशी शक्यता कायदा क्षेत्रातील जाणकारांकडून वर्तवली जात होती. त्यापार्श्वभूमीवर, उच्च न्यायालयाने या प्रकरणात आधी नोटीस जारी केली आहे.

# भारत-म्यानमार सीमेबाबत मोठा निर्णय!

## घुसखोरी रोखण्यासाठी सरकार सीमेवर घालणार कुंपण

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रातल्या मोदी सरकारने अलीकडच्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षित करण्यावर भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून सरकारने म्यानमारला लागून असलेल्या सीमेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. म्यानमारमधून भारतात होणारी घुसखोरी रोखण्यासाठी केंद्र सरकार या सीमेवर कुंपण घालणार आहे. आसाममधील पोलीस कमांडोंच्या पासिंग आऊट परेडमध्ये गृहमंत्री अमित शाह यांनी या निर्णयाची घोषणा केली. बांगलादेशच्या धर्तीवर भारत सरकार आता म्यानमारला लागून असलेल्या सीमेवरही कुंपण घालणार आहे. भारत आणि म्यानमारमधील मुक्त हालचालींबाबत सरकार पुनर्विचार करत असल्याचंही शाह यांनी यावेळी स्पष्ट केलं. त्यामुळे केंद्र सरकार उभय देशांमधील नागरिकांचा सीमेवरील मुक्तसंचार बंद करू शकतं.**




### सीमा सुरक्षित करण्यावर भर

२०२१ पासून आतापर्यंत आसाम पोलिसांनी तब्बल १३,५६० तस्करांना अटक केली आहे. एनडीपीएस कायद्यांतर्गत ८,१०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईचा दाखला देत अमित शाह म्हणाले, ही सीमा सुरक्षित करणं आता आवश्यक आहे.केंद्रातल्या मोदी सरकारने अलीकडच्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षित करण्यावर भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून सरकारने म्यानमारला लागून असलेल्या सीमेबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकार म्यानमारच्या सीमेवरून होणारी ये-जा बंद करण्याच्या विचारात आहे. याबाबत अमित शाह म्हणाले, “आपलं सरकार लवकरच म्यानमारची सीमा सुरक्षित करेल. यासह आपण सीमेवर कुंपण घालणार आहोत.” म्यानमारच्या सीमेवरून होणारी तस्करी अलीकडच्या काळात वाढली आहे. २०२१ पासून आतापर्यंत आसाम पोलिसांनी तब्बल १३,५६० तस्करांना अटक केली आहे. एनडीपीएस कायद्यांतर्गत ८,१०० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईचा दाखला देत अमित शाह म्हणाले, ही सीमा सुरक्षित करणं आता आवश्यक आहे.केंद्रातल्या मोदी सरकारने अलीकडच्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षित करण्यावर भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून सरकारने म्यानमारला लागून असलेल्या सीमेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. म्यानमारमधून भारतात होणारी घुसखोरी रोखण्यासाठी केंद्र सरकार या सीमेवर कुंपण घालणार आहे. आसाममधील पोलीस कमांडोंच्या पासिंग आऊट परेडमध्ये गृहमंत्री अमित शाह यांनी या निर्णयाची घोषणा केली. बांगलादेशच्या धर्तीवर भारत सरकार आता म्यानमारला लागून असलेल्या सीमेवरही कुंपण घालणार आहे. भारत आणि म्यानमारमधील मुक्त हालचालींबाबत सरकार पुनर्विचार करत असल्याचंही शाह यांनी यावेळी स्पष्ट केलं. त्यामुळे केंद्र सरकार उभय देशांमधील नागरिकांचा सीमेवरील मुक्तसंचार बंद करू शकतं.अमित शाह म्हणाले, निवडणुकीच्या वेळी आम्ही आसाममधील तरुणांना आश्वासन दिलं होतं की, कोणत्याही भ्रष्टाचाराशिवाय राज्यातील तरुणांना नोकऱ्या दिल्या जातील. मुख्यमंत्री हिंमता बिस्व सरमा सरकारने हे आश्वासन पूर्ण केलं आहे. काँग्रेसच्या काळात आसाममधील तरुणांना नोकरीसाठी पैसे मोजावे लागत होते. परंतु, आमच्या सरकारने इथल्या तरुणांना नोकऱ्या देताना कुठलाही भ्रष्टाचार होऊ दिला नाही. अनेकांची घरबसल्या उद्योगधंद्यांमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.अमित शाह म्हणाले, भारत आता संपूर्ण जगात मोठी शक्ती म्हणून पुढे येतोय. आपला देश २०४७ मध्ये संपूर्ण विकसित आणि आत्मनिर्भर राष्ट्र म्हणून पुढे येईल. अयोध्येतील भव्य मंदिरात रामलल्ला विराजमान झाल्यानंतर याची सुरुवात होईल. यासह संपूर्ण ईशान्य भारतात नव्या युगाची सुरुवात होईल, तसेच सर्वत्र शांतता प्रस्थापित होईल.केंद्रातल्या मोदी सरकारने अलीकडच्या काळात भारताच्या आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षित करण्यावर भर दिला आहे. याचाच एक भाग म्हणून सरकारने म्यानमारला लागून असलेल्या सीमेबाबत मोठा निर्णय घेतला आहे. म्यानमारमधून भारतात होणारी घुसखोरी रोखण्यासाठी केंद्र सरकार या सीमेवर कुंपण घालणार आहे. आसाममधील पोलीस कमांडोंच्या पासिंग आऊट परेडमध्ये गृहमंत्री अमित शाह यांनी या निर्णयाची घोषणा केली. बांगलादेशच्या धर्तीवर भारत सरकार आता म्यानमारला लागून असलेल्या सीमेवरही कुंपण घालणार आहे.

# राम मंदिरासाठी वाट पाहणारे हिंदू सहिष्णू

## त्यांना शांततेचं नोबेल मिळालं पाहिजे : मुंतशिर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राम मंदिरातल्या रामाच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठा सोहळा अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला आहे. अयोध्येत या सोहळ्याची जय्यत तयारी होते आहे. रामाची मूर्ती गाभाऱ्यात ठेवण्यात आली आहे. एक बाळ रुपातला राम तर दुसरी रामलल्ला रुपातली मूर्ती आहे जी अरुण योगीराज यांनी घडवली आहे. या दोन्ही मूर्तींची प्राण प्रतिष्ठा होणार आहे. हा सोहळा जवळ येऊन ठेपलेला असतानाच लेखक, पटकथा लेखक मनोज मुंतशिर यांचं एक वक्तव्य समोर आलं आहे.**



हिंदू समाज खूप सहिष्णू आहे. हिंदू समाजाला शांततेचं नोबेल दिलं पाहिजे असं त्यांनी म्हटलं आहे.“खरं तर मला हे वाटलंच नव्हतं की रामाचं मंदिर बांधून होईल. मात्र आज राम मंदिर बांधून तयार आहे. रामलल्ला त्यामधअये विराजमान होणार आहेत. माझ्यासाठी हे सगळं स्वप्नवत आहे. तसंच हे स्वप्न असं आहे की जे संपूच नये असं वाटतं. रामाच्या मंदिरात काही तासांनीच प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार आहे. माझ्यासाठी ही स्वप्नपूर्तीच आहे.” रामाचं मंदिर होईल असं वाटलं होतं का? हे विचारलं असता त्यांनी हे उत्तर दिलं आहे. आजतक वृत्त वाहिनीच्या साहित्य तक या कार्यक्रमात मनोज मुंतशिर यांनी हे विधान केलं आहे.मनोज पुढे म्हणाले, “आपण भारतात राहतो आणि आपल्याला हे सिद्ध करावं लागतं की रामाचा जन्म हा अयोध्येत झाला होता ही बाब म्हणजे दुर्दैवी आहे. १८८५ ते २०१९ या कालावधीत कायदेशीर लढाईच चालली ही सर्वात मोठी वेदना होती असं माझं मत आहे. आपण मक्क्यात राम मंदिर बांधलं गेलं पाहिजे अशी मागणी तर केली नव्हती. आपण अयोध्येतच राम मंदिर बांधण्याची विनंती केली होती. त्यासाठी इतक्या वर्षांची कायदेशीर लढाई लढावी लागली.”मनोज मुंतशिर पुढे म्हणाले, जे वकील रामनवमी आणि दसऱ्याच्या दिवशी, दिवाळीच्या दिवशी सुट्टी घेत होते त्यांना पुरावा हवा होता की श्रीराम होते. ५०० वर्षे हिंदूंना आपल्या हक्कासाठी लढा द्यावा लागला. त्यासाठी रक्ताचे पाट वाहिले नाहीत. मी तुम्हाला हे कसं सांगू की हिंदू किती सहिष्णू आहेत. जर जागतिक शांततेचं नोबेल कुणाला द्यायचं असेल तर ते एका व्यक्तीला नाही.

# प्रशांत किशोर यांच्या राजकारणातील एंट्रीची योजना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

राजकीय रणनीतिकार प्रशांत किशोर सध्या बिहारच्या राजकारणात सक्रीय झाले आहेत. केंद्रात आणि अनेक राज्यांमध्ये वेगवेगळ्या पक्षांना सत्ता मिळवून देण्यात किशोर यांचा मोठा वाटा आहे. बिहारमधील सत्ताधारी जनता दल युनायटेड पक्षाच्या मागील निवडणुकीतल्या यशामागे प्रशांत किशोर होते, असं सांगितलं जातं. हेच प्रशांत किशोर आता बिहारच्या राजकारणात सक्रीय झाले आहेत. प्रशांत किशोर यांनी बिहारमध्ये ‘जनसुराज’ पदयात्रा सुरू केली आहे. या यात्रेमधून ते थेट बिहारमधील मतदारांशी संपर्क साधत आहेत. प्रशांत किशोर हे लवकरच निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचं सांगितलं जातं. परंतु, त्यांच्या राजकीय पक्षाची स्थापना कधी होणार? ते निवडणूक कधी लढणार? कोणत्या मतदार संघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार? असे प्रश्न अनेकांना पडले आहेत. यावर स्वतः प्रशांत किशोर यांनी उत्तरं दिली आहेत.प्रशांत किशोर म्हणाले, आधी बिहारचा समाज बदलासाठी तयार व्हायला हवा. लोकसभा किंवा विधानसभा निवडणूक कोण जिंकणार हे महत्त्वाचं नाही. समाज बदलायला हवा. आम्ही २०१५ मध्येच बिहारची निवडणूक जिंकलो होतो. परंतु, त्याने बिहारचा समाज बदलला का? बिहार बदललं का? विकास झाला का? या सर्व गोष्टींवर लक्ष देण्याची आवश्यकता आहे. निवडणूक लढण्याच्या प्रश्नावर प्रशांत किशोर म्हणाले, मी निवडणूक लढणं किंवा न लढणं हा काही महत्त्वाचा विषय नाही. सर्वांना वाटलं तर मी निवडणुकीला उभा राहीन.

# सुप्रिया पिळगावकरांनी लेकीसाठी घेतला होता मोठा निर्णय

मिर्झापूर' वेबसीरिजमुळे अभिनेत्री श्रिया पिळगावकर घराघरांत लोकप्रिय झाली. बॉलीवूडमध्ये तिने अल्पावधीतच स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. श्रिया ही दिग्गज अभिनेते सचिन व अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर यांची एकुलती एक लेक आहे. आपल्या आई-बाबांच्या पावलावर पाऊल टाकत तिने इंडस्ट्रीत पदार्पण केलं. श्रियाने नुकतीच 'व्हायफळ' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने वैयक्तिक आयुष्यातील अनेक किस्से सांगितले.श्रियाबद्दल आजही अनेकांना तिला मराठी वाचता येत नाही असा गैरसमज आहे. याबद्दल अभिनेत्रीला या मुलाखतीत विचारण्यात आलं. याविषयी सांगताना अभिनेत्री म्हणाली, "काही जणांना असं वाटतं मला मराठी वाचता येत नाही. पण, असं नाहीये... मला व्यवस्थित मराठी वाचता येतं. अर्थात असं विचारणं स्वाभाविक आहे कारण, माझ्या ओळखीतल्या अनेक महाराष्ट्रीय मित्रमंडळींना मराठी वाचता येत नाही. मी पाचवीपर्यंत ICSE बोर्डात होते. माझ्या त्या शाळेत पाचवीनंतर



मराठी विषय ठेवणार नव्हते. ही गोष्ट समल्यावर आईने माझी बदलण्याचा निर्णय घेतला. माझी शाळा बदलून तिने मला SSC बोर्डात घातलं. जेणेकरून मला मराठी या विषयाचं व्यवस्थित शिक्षण मिळेल."श्रिया पुढे म्हणाली, "शाळेमुळे मला मराठी उत्तम वाचता आणि लिहिता येतं. अर्थात मला मराठी पुस्तक वाचण्याची फारशी सवय नाही. पण, मला कोणी मराठी पुस्तक दिलं, तर मी नक्की वाचते. आई मला लहानपणी अनेक मराठी पुस्तक वाचायला द्यायची. त्यात लहान-लहान मराठी गोष्टी असायच्या.""माझे आजोबा मला पु.ल.देशपांडेंच्या गोष्टी सांगायचे. मी मराठी पुस्तक उत्तमप्रकारे वाचू शकते. पण, सध्या कामामुळे माझं फारसं वाचन होत नाही. शूटिंग करताना स्क्रिप्ट सुद्धा मी मूळ देवनागरी भाषेत वाचते. तेच मला जास्त सोयीस्कर वाटतं." असं श्रियाने सांगितलं.

मिर्झापूर' वेबसीरिजमुळे अभिनेत्री श्रिया पिळगावकर घराघरांत लोकप्रिय झाली. बॉलीवूडमध्ये तिने अल्पावधीतच स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. श्रिया ही दिग्गज अभिनेते सचिन व अभिनेत्री सुप्रिया पिळगावकर यांची एकुलती एक लेक आहे. आपल्या आई-बाबांच्या पावलावर पाऊल टाकत तिने इंडस्ट्रीत पदार्पण केलं. श्रियाने नुकतीच 'व्हायफळ' या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने वैयक्तिक आयुष्यातील अनेक किस्से सांगितले.श्रियाबद्दल आजही अनेकांना तिला मराठी वाचता येत नाही .

## तुला शिकवीन चांगलाच धडा

'तुला शिकवीन चांगलाच धडा' मध्ये अक्षरा आणि भुवनेश्वरीची लढाई एका वेगळ्या वळणावर पोहचली आहे. भुवनेश्वरीच सगळ्यात मोठं सत्य अक्षरा समोर आलं आहे. भुवनेश्वरी, अधिपतीची खरी आई नाही हे सत्य ती अधिपतीला सांगायला जाते. अक्षरा सत्य सांगताना भुवनेश्वरीच्या अनेक गोष्टी अधिपती समोर आणते, हे सगळं अधिपती शांतपणे ऐकून घेतो. अक्षरा त्याला पटवून देते की कसं भुवनेश्वरी तुम्हाला अधोगतीकडे ढकलत आहे. आईबद्दल इतकं ऐकल्यावर अधिपतीचा पारा चढतो आणि तो अक्षरावर हात उचलतो. पहिल्यांदाच अक्षरा आणि अधिपती मध्ये वाद इतक्या टोकेला पोहचतो. अक्षरा, अधिपतीचे वागणं पाहून अधिपतीला सोडून जाईल का? अधिपती समोर भुवनेश्वरीच सत्य समोर आणण्याचा ध्यास अक्षरा सोडून देईल का?

## तंत्रज्ञान कायद्यात सुधारणा

अभिनेत्री रश्मिका मंदाना डीपफेक व्हिडिओ प्रकरणातील मुख्य आरोपीला दिल्ली पोलिसांच्या विशेष शाखेने अटक केली आहे. इमानी नवीन असे त्याचे नाव आहे. अभियंता असणारा नवीन हा सराईत सायबर गुन्हेगार आहे. त्याने रश्मिकाचा डीपफेक व्हिडिओ का केला, याची कबुलीही पोलिसांसमोर दिली आहे. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी इमानी नवीन हा मूळचा गुंटूरमधील पेदानंदीपाडू गावचा रहिवासी आहे. सोशल मीडियावर रश्मिकाच्या नावाने इन्स्टा फॅन पेजचे फॉलोअर्स वाढवण्यासाठी त्याने डीपफेक व्हिडिओ तयार केला होता. तो तीन प्रसिद्ध सेलिब्रिटींसाठी फॅन पेजेस चालवतो. रश्मिका मंदनाच्या फॅन पेजचे फॉलोअर्स वाढवण्यासाठी त्याने १३ ऑक्टोबर २०२३ रोजी डीपफेक व्हिडिओ तयार केला आणि पोस्ट केला होता. नवीन याने रश्मिकाचा डीपफेक व्हिडिओ पोस्ट केला आणि रश्मिकाच्या नावाने असणाऱ्या पेजच्या फॉलोअर्सची संख्या दोन आठवड्यांत 90,000 वरून 1,08,000 पर्यंत वाढवली. दरम्यान, या प्रकरणी सर्वच स्तरातून टीका झाली. यानंतर नवीनने घाबरून इंस्टाग्राम पेजवरून पोस्ट हटवल्या. तसेच त्याने पेजचे नावही बदलले. तसेच सर्व डिजिटल डेटा डिलिट केला होता. रश्मिकाचा डीपफेक व्हिडिओ पोस्ट करणारा इमानी नवीन हा इलेक्ट्रॉनिक्स आणि कम्युनिकेशनमध्ये बीटेक पदवीधर आहे. 2019 मध्ये त्याने ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्मवरून डिजिटल मार्केटिंगसह फोटोशॉप, व्हिडिओ एडिटिंग अभ्यासक्रम पूर्ण त्याने पूर्ण केला.



## 'मैं अटल हूं' ची निराशाजनक सुरुवात

भारताचे माजी पंतप्रधान दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर आधारित 'मैं अटल हूं' हा चित्रपट १९ जानेवारी रोजी देशभरातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटात दिग्गज अभिनेते पंकज त्रिपाठी यांनी अटल बिहारी वाजपेयी यांची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाच्या पहिल्या दिवसाच्या कमाईचे आकडे समोर आले आहेत.मैं अटल हूं' चे दोन ट्रेलर रिलीज करण्यात आले होते. ट्रेलर रिलीज झाल्यापासून प्रेक्षक या चित्रपटाची आतुरतेने वाट पाहत होते. हा चित्रपट माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जीवनप्रवास दाखवतो. हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करेल, असं वाटलं होतं. पण रिलीजच्या पहिल्याच दिवशी 'मैं अटल हूं'ला बॉक्स ऑफिसवर प्रेक्षकांचा विशेष प्रतिसाद मिळाला नाही आणि त्यामुळे चित्रपटाची सुरुवात खूपच संथ झाली.'मैं अटल हूं' च्या रिलीजच्या पहिल्या दिवसाच्या कमाईची प्रारंभिक आकडेवारी समोर आली आहे. 'सॅकनिल्क' च्या सुरुवातीच्या ट्रेंड रिपोर्टनुसार, 'मैं अटल हूं' ने रिलीजच्या पहिल्या दिवशी फक्त १ कोटी रुपये कमावले आहेत. ही सुरुवात नक्कीच निराशाजनक आहे. चित्रपटाचं जोरदार प्रमोशनही करण्यात आलं आहे, पण तरीही चित्रपटाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवल्याचं दिसतंय. मैं अटल हूं' च्या पहिल्या दिवसाची निराशाजनक आकडेवारी पाहता आता वीकेंडला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणं महत्त्वाचं ठरेल. शनिवार व रविवारी चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाल्यास त्याच्या कमाईत वाढ होईल व चित्रपट पुढील काही दिवस थिएटरमध्ये टिकून राहिल. हा चित्रपट प्रेक्षकांना थिएटर्समध्ये आकर्षित करण्यात यशस्वी होणार की नाही, हे वीकेंडनंतर कळेल.

## तापसीचं 'ॲनिमल' चित्रपटाबद्दलचं वक्तव्य चर्चेत

संदीप रेड्डी वांगा दिग्दर्शित 'ॲनिमल' हा चित्रपट जेव्हा थिएटरमध्ये प्रदर्शित झाला तेव्हा त्याने खळबळ उडवून दिली. काहींना हा चित्रपट आवडला तर अनेकांनी त्यावर टीकाही केली. जावेद अख्तर आणि स्वानंद किरकिरे यांनीही 'ॲनिमल'वर टीका केली. हिंसाचार आणि महिलांबद्दलच्या दृष्टिकोनापासून ते गैरवर्तन आणि वादग्रस्त संवादांपर्यंत चित्रपटात वेगवेगळ्या गोष्टी दाखवण्यात आल्या ज्यांची चांगलीच चर्चा झाली. आता बॉलिवूड अभिनेत्री तापसी पन्नूनेही आता 'ॲनिमल'वर प्रतिक्रिया दिली आहे. इतकंच नव्हे ती असे चित्रपट कधीच करणार नाही असे वक्तव्यही तिने केले आहे.नुकतंच राज शमानी या प्रसिद्ध युट्यूबरच्या पॉडकास्ट शोमध्ये अभिनेत्री तापसी पन्नूने हजेरी लावली अन् यावेळी तिने 'ॲनिमल'वर भाष्य केलं. ती चित्रपटाची चाहती नसून अद्याप तिने हा चित्रपट पाहिलेला नसल्याचंही स्पष्ट केलं. तापसी म्हणाली, "बऱ्याच लोकांनी मला 'ॲनिमल'बद्दल सांगितलं, मी एक्स्ट्रिमिस्ट नाहीये त्यामुळे मी बऱ्याच लोकांशी असहमत आहे. या चित्रपटाची तुलना हॉलिवूडशी कृपया करू नये. जर 'गॉन गर्ल' आवडला असेल तर 'ॲनिमल' आवडायला काय हरकत आहे असं तर कुणीच बोलू नये. आपला प्रेक्षकवर्ग पूर्णपणे वेगळा आहे. हॉलिवूडचा प्रेक्षक अभिनेत्याच्या हेअर स्टाईलची नक्कल करत नाही, ते खऱ्या आयुष्यात फिल्मी डायलॉगचा वापर करत नाहीत." पुढे तापसी पन्नू म्हणाली, "एखादा चित्रपट बघून तिथला प्रेक्षक एखाद्या महिलेचा पाठलाग करायला लागत नाही. परंतु आपल्या देशात या सगळ्या गोष्टी घडतात, हे वास्तव आहे. तुम्ही आपल्या चित्रपटसृष्टीची तुलना हॉलिवूडशी करू शकत नाही."



# शोएबच्या 'निकाह'वर कुटुंबीय नाराज!

## शोएब मलिकच्या दोन पत्नी भारतीय, तर तिसरी पाकिस्तानी

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिकने तिसरं लग्न केलं आहे. त्याने पाकिस्तानी अभिनेत्री सना जावेदशी लग्न केल्याची बातमी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करून दिली. शोएबचं हे तिसरं लग्न आहे पण सना ही पहिली पत्नी आहे जी पाकिस्तानी आहे. यापूर्वीच्या शोएबच्या दोन्ही पत्नी भारतीय होत्या. त्याच्या पहिल्या पत्नीचं नाव आयशा सिद्दीकी होतं, तर दुसरी पत्नी भारतीय टेनिसपटू सानिया मिर्झा होती.**



शोएब मलिकचे पहिले लग्न २००२ मध्ये आयशा सिद्दीकीशी झालं होतं. शोएबच्या पहिल्या लग्नाचा खुलासा त्याने सानिया मिर्झाशी लग्न केलं, तेव्हा झाला होता. शोएब मलिक आणि सानिया मिर्झाच्या लग्नाआधी आयशा सिद्दीकीने आपण पाकिस्तानी क्रिकेटरची पहिली पत्नी असल्याचा दावा केला होता. यासंदर्भात 'डीएनए' ने वृत्त दिलं आहे. आयशा सिद्दीकी हैदराबादमधील रहिवासी आहे. तिला महा नावानेही ओळखलं जातं. आयशा शिक्षिका होती. आयशाने स्वतः खुलासा केला होता की शोएब मलिकने २००२ मध्ये तिच्याशी लग्न केलं होतं. तसेच पहिल्या पत्नीला घटस्फोट न देता सानिया मिर्झाशी दुसरं लग्न केल्याचाही आरोपही शोएबवर झाला होता.आयशाने हे दावे केल्यानंतर सुरुवातीला शोएबने त्याच्या पहिल्या लग्नाची बाब नाकारली होती, पण शेवटी आयशा ही त्याची पहिली पत्नी होती हे त्याने स्वीकार केलं होतं. आयशाने माजी पाकिस्तानी क्रिकेटपटूविरुद्ध फसवणुकीचा गुन्हाही दाखल केला होता आणि पुरावा म्हणून शोएबसोबतच्या तिच्या लग्नाचा व्हिडिओ पोलिसांना दाखवला होता.या सर्व गोष्टी बाहेर आल्यानंतर शोएब मलिकने सानिया मिर्झाशी लग्न करण्यापूर्वी आयशाला घटस्फोट दिला. हे प्रकरण केवळ घटस्फोटावरच संपलं नव्हतं. तर मीडिया रिपोर्ट्सनुसार, शोएबने आयशाला पोटगी म्हणून १५ कोटी रुपयेही दिले होते.भारताची स्टार टेनिपटू सानिया मिर्झा आणि पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिक यांचा घटस्फोट झाल्याच्या चर्चेला उधाण आलं होतं. त्यानंतर आज शोएब मलिक आणि अभिनेत्री सना जावेद यांच्या निकाहचीच बातमी समोर आली. शोएब मलिकने ट्विटवरून आपल्या तिसऱ्या लग्नाची माहिती सर्वांना दिली. सानिया मिर्झाने काही दिवसांपूर्वीच एक पोस्ट करून लग्न आणि घटस्फोट या दोन्ही गोष्टी अवघड असल्याचे मत व्यक्त केलं होतं. त्याचवेळी शोएब आणि तिचा घटस्फोट झाल्याची चर्चा सुरू झाली. सानिया मिर्झा ही शोएब मलिकच्या अफेअर्समुळे त्रस्त झाली होती. दरम्यान, पाकिस्तानी माध्यमांमध्ये सानिया मिर्झाने 2022 मध्येच शोएब मलिकसोबत तलाक घेण्यासाठी अर्ज केल्याची बातमी आली होती. जिओ न्यूज नुसार 37 वर्षाची सानिया शोएब मलिकच्या विवाहबाह्य संबंधांमुळे वैतागली होती. सुरुवातीला तिने हे प्रकरण सामंजस्याने घेत सोडवण्याचा प्रयत्न केला. मात्र ती शोएबने धोका दिल्याने नाराज होती. शोएबचे नाव अनेक महिलांशी जोडले गेले त्यानंतर तिने तलाकसाठी अर्ज दाखल केला होता. या वृत्तांमध्ये सानियाने हा अर्ज कोठे दिला होता आणि त्यावर काय निर्णय आला हे सांगितले नाही.शोएब मलिकच्या तिसऱ्या लग्नासाठी त्याच्या कुटुंबातील कोणताही सदस्य सामिल झाला नव्हता. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार सानियासोबत शोएबने संबंध तोडल्यामुळे कुटुंबीय नाराज आहेत. मलिकचा मेव्हणा इम्रान जफरने सांगितले की त्याला या लग्नाबाबत सोशल मीडियाद्वारेच माहिती मिळाली. त्यांनी सांगितलं की शोएबच्या निकाह सोहळ्यात त्यांच्या परिवाराकडून कोणीही सामिल झालं नव्हतं.सूत्रांनी दावा केल्याप्रमाणे शोएब आणि सानिया यांच्यातील वाद मिटवण्यासाठी कुटुंबीय 2022 च्या शेवटी दुबईत गेले होते. शोएबचे कुटुंबीय तलाकच्या बाजूने नव्हते. शोएब मलिकचे कुटुंबीय तलाकमुळे फार दुःखी आहेत. त्यांनी शोएबला नातं सुधारण्यावर लक्ष देण्यास सांगितलं होतं.

### शोएबच्या पहिल्या लग्नाचा खुलासा

» मिळालेल्या माहितीनुसार सना आणि शोएब हे दीर्घ काळापासून रिलेशनशिपमध्ये होते. मात्र शोएबने हे कायम फेटाळलं.पाकिस्तानी क्रिकेटपटू शोएब मलिकने तिसरं लग्न केलं आहे. त्याने पाकिस्तानी अभिनेत्री सना जावेदशी लग्न केल्याची बातमी इन्स्टाग्रामवर पोस्ट शेअर करून दिली. शोएबचं हे तिसरं लग्न आहे पण सना ही पहिली पत्नी आहे जी पाकिस्तानी आहे. यापूर्वीच्या शोएबच्या दोन्ही पत्नी भारतीय होत्या. त्याच्या पहिल्या पत्नीचं नाव आयशा सिद्दीकी होतं, तर दुसरी पत्नी भारतीय टेनिसपटू सानिया मिर्झा होती. शोएब मलिकचे पहिले लग्न २००२ मध्ये आयशा सिद्दीकीशी झालं होतं. शोएबच्या पहिल्या लग्नाचा खुलासा त्याने सानिया मिर्झाशी लग्न केलं, तेव्हा झाला होता.

# युवा ब्रिगेडकडून विश्वचषकाची विजयी सुरुवात

## बांगलादेशचा दारूण पराभव करत बांगलादेशला 84 धावांनी लोळवलं!

।नवी दिल्ली। प्रतिनिधी : महाईन्यूज

**अंडर-19 वर्ल्ड कप स्पर्धेत भारताच्या युवा ब्रिगेडने विजयाने सुरुवात केली आहे. आज झालेल्या सामन्यात भारताच्या युवा संघाने बांगलादेशचा दारुण पराभव करत विश्वचषकाची विजयी सुरुवात केली. भारताने बांगलादेश संघासमोर विजयासाठी 252 धावांचे आव्हान ठेवलं होतं. पण भारताच्या भेदक माऱ्यापुढे बांगलादेशचा संघ 45.5 षटकात 167 धावांत गारद झाला.**



विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात भारताने बांगलादेशचा 84 धावांनी पराभव केला. बांगलादेशकडून मोहम्मद शिहाब जेम्स याने सर्वाधिक धावा केल्या. त्याने 77 चेंडूत 54 धावांचे योगदान दिले. त्याशिवाय अरिफुल इस्लाम याने 71 चेंडूत 41 धावा जोडल्या. बांगलादेशच्या इतर फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली. भारताकडून सौम्य पांडे याने भेदक मारा केला. त्याने 9.5 षटकात अवघ्या 24 धावा खर्च करत चार फलंदाजांना तंबूत पाठवले. मुशीर खान याने दोन विकेट घेतल्या. राज लिंबानी, अर्शिन कुलकर्नी आणि प्रियांशु मोलिया यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली.बांगलादेशच्या कर्णधाराने नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या टीम इंडियाने 50 षटकात सात विकेट्सच्या मोबदल्यात 251 धावांपर्यंत मजल मारली. भारताकडून आदर्श सिंह याने सर्वाधिक धावा चोपल्या. आदर्श सिंह याने 96 चेंडूमध्ये 76 धावा केल्या. त्याने आपल्या डावात सहा चौकार लगावले. त्याशिवाय भारताचा कर्णधार उदय सहारन याने 94 चेंडूमध्ये चार चौकारांच्या मदतीने 64 धावांचे योगदान दिले. विकेटकिपर अरवली अवनीश आणि सचिन दास यांनी अखेरच्या षटकात झटपट धावा केल्या. अरवली अवनीश याने 17 चेंडूत एक चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने 23 धावा केल्या. तर सचिन दास याने 26 धावांचे योगदान दिले. यामध्ये एक षटकार आणि दोन चौकारांचा समावेश होता. भारताच्या इतर फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. बांगलादेशकडून मारुफ मृधा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने भारताच्या पाच फलंदाजांना तंबूत पाठवले. त्याशिवाय चौधरी मोहम्मद रिजवान आणि महफुजर रहमान राबी यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. भारताच्या युवा संघाने बांगलादेशचा पराभव केल्यानंतर गुणतालिकेत मोठा बदल झाला आहे. भारतीय संघ आपल्या ग्रुपमध्ये दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे. आयर्लंड संघ पहिल्या स्थानावर कायम आहे. भारत आणि आयर्लंड संघाचे प्रत्येकी दोन दोन गुण आहेत. पण आयर्लंडचा रनरेट चांगला असल्यामुळे ते पहिल्या क्रमांकावर आहेत. आता भारतीय संघाचा पुढील सामना 25 जानेवारी रोजी आयर्लंडच्या विरोधात आहे. या सामन्यात जिंकणारा संघ गुणतालिकेत पहिल्या स्थानावर विराजमान होईल. भारतीय संघ 28 जानेवारी रोजी अमेरिकाविरोधात मैदानात उतरेल.

### अरिफुल इस्लामच्या 41 धावा

» विश्वचषकाच्या पहिल्याच सामन्यात भारताने बांगलादेशचा 84 धावांनी पराभव केला. बांगलादेशकडून मोहम्मद शिहाब जेम्स याने सर्वाधिक धावा केल्या. त्याने 77 चेंडूत 54 धावांचे योगदान दिले. त्याशिवाय अरिफुल इस्लाम याने 71 चेंडूत 41 धावा जोडल्या. बांगलादेशच्या इतर फलंदाजांनी निराशाजनक कामगिरी केली.